RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२७१ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.२ जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## ड्रायव्हर संपाचा मोठा फटका, अनेक शहरात इंधनाचा तुटवडा; पेट्रोल पंपावर रांगा

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**
**नवी दिल्ली**

केंद्र सरकारकडून हिट अँन्ड रन कायद्याच्या सुधारणेविरोधात संपूर्ण देशात ट्रक आणि डंपर चालकांनी चक्का जाम आंदोलन केले आहे. हा कायदा चुकीचा असून तो परत घेतला पाहिजे अशी मागणी करत मुंबई, इंदूरपासून दिल्ली हरियाणा, यूपीसह अनेक ठिकाणी ट्रक चालकांनी ट्रक रस्त्यावर उभे करत वाहतूक रोखली आहे. महाराष्ट्रात काही ट्रक चालकांनी आक्रमक पवित्रा घेत पोलिसांवर हल्ला केला आहे. या आंदोलनाचे पडसाद संपूर्ण देशभरात उमटत आहेत.



**काय आहे हिट अँड रन कायदा?**

हिट अँड रन या कायद्याद्वारे सरकारने अपघातातील वाहनचालकांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. ज्यात जर कुठलाही ट्रक अथवा डंपर चालकाने कुणाला चिरडले तर त्याला १० वर्षाची जेल होऊ शकते. त्याशिवाय ७ लाखांचा दंडही भरावा लागू शकतो. याआधी अशा प्रकरणात आरोपी ड्रायव्हरला जामीन मिळत होता त्यामुळे तो लगेच बाहेर यायचा. त्याचसोबत या सध्या २ वर्षाची शिक्षेची तरतूद होती.

**नव्या कायद्याविरोधात ट्रक चालक संतप्त**

सरकारच्या या कायद्याविरोधात ट्रक चालकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. हा कायदा कठोर आहे. सरकारने तो परत घ्यावा अशी मागणी ट्रक चालकांनी लावून धरली आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले जात आहे. मुंबई, महाराष्ट्रातही हे आंदोलन पेटले आहे. सरकारच्या कायद्याविरोधात ट्रक चालक एकवटले आहेत. त्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे.

**पेट्रोल-डिझेलचा तुटवडा, पंपावर मोठी रांग**

ट्रक चालकांच्या देशव्यापी आंदोलनाचा फटका सर्वसामान्य जनतेला होत आहे. ट्रक चालकांच्या संपामुळे इंधन वाहतूक थांबली आहे. त्यामुळे अनेक पेट्रोल पंपावर इंधनाचा तुटवडा जाणवू लागला आहे. त्यातच काही पेट्रोल पंपावर इंधनच नसल्याचे चित्र निर्माण झाले आहे. पेट्रोल डिझेल मिळत नसल्याने जिथे मिळेल तिथे वाहनांच्या प्रचंड रांगा लागल्या आहेत.गेल्या ३ दिवसांपासून इंडियन ऑयलच्या इंधनाचा पुरवठा करणाऱ्या वाहनांवर परिणाम झाला आहे. हिमाचल प्रदेशात पेट्रोल डिझेलचे संकट उभे राहिल्याने पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात इंधन पुरवठा सुरू करण्यात आला आहे.

## अक्षता कलशाचे उत्साहात स्वागत करा : जयंत पाटील

### राम मंदिराचा आनंद, अयोध्येला जाणार

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**
**सांगली**

राम मंदिर उभे राहतेय याचा निश्चितच आनंद असून, आपणही गर्दी कमी झाल्यानंतर अयोध्येला जाणार आहे. दरम्यान प्रभू रामचंद्रांच्या मूर्तीची प्राण प्रतिष्ठापना २२ जानेवारी रोजी केली जाणार आहे. त्यानिमित्त आपल्या तालुक्यातील गावोगावी अक्षता कलशाचे आगमन होत आहे. याचे सर्वानी उत्साहाने आणि भक्तिभावाने स्वागत करावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांनी माध्यमांशी बोलताना केले.



आमदार संजय शिरसाट यांनी जयंत पाटील हे मनाने महायुतीसोबतच असल्याचे विधान केल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी केलेल्या या विधानास महत्व प्राप्त झाले आहे.

राजारामबापू कारखान्यावर श्रीराम मंदिरातील अक्षता कलशपूजन झाल्यानंतर आमदार पाटील बोलत होते. ते म्हणाले, की राज्यात रामराज्य यावे ही जनतेची अपेक्षा आहे. राम मंदिर उभे राहतेय याचा निश्चितच आनंद आहे.

## पुढील ३० दिवसांत राज्यात पुन्हा मोठी राजकीय घडामोड घडणार?; अंजली दमानियांचा दावा



**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**
**मुंबई**

जानेवारी महिन्यात ऑपरेशन लोटस होण्याची शक्यता आहे. सगळ्या निवडणुकांच्या आधी हे होईल. काँग्रेसही फुटेल. राम मंदिर सोहळ्यानंतर किंवा आधीही महाराष्ट्रात या घडामोडी घडतील असा दावा सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे.

अंजली दमानिया म्हणाल्या की, येणाऱ्या काळात राज्यातील काँग्रेस पक्ष भाजपा फोडेल. त्यामुळे विरोधी पक्षच उरणार नाही. त्यामुळे आमच्या सारख्यांनाच विरोधी पक्षाची भूमिका घ्यावी लागेल. लढावे लागेल. जो अमाप भ्रष्टाचार चालला आहे आणि भाजपा भ्रष्टाचारांना आपल्या पक्षात ओढून घेतंय ते बघून दु:ख होते. त्यामुळे आम्हाला वेदना होतात. हीच भाजपा भ्रष्टाचाराविरोधात लढायची का? असा सवाल त्यांनी विचारला आहे.

तसेच ज्या लोकांना राजकारणातून उचलून फेकून द्यायला हवे अशा लोकांना देवेंद्र फडणवीस मोठे करतायेत अशी माझ्या मनात शंका आहे. जरांगेबद्दल म्हटलं जाते की ते एकनाथ शिंदेंच्या सांगण्यावरून करतात तसं मीदेखील ऐकलं.परंतु मला तसं वाटत नाही. आज लढायचे झाले, तर कुणाविरोधातही लढले तरी त्यामागे बनावट कट रचला जातो. पूर्वी मी खडसेंविरोधात, सिंचन घोटाळ्याविरोधात लढले तेव्हा मी फडणवीसांसाठी लढतेय असं लोक म्हणायचे. पण आज मी फडणवीसांविरोधात लढले तर पुन्हा लोक तर्कवितर्क लावतात असा आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केले आहे.

### मनोज जरांगेंचं कौतुक अन् दिला सल्ला

दरम्यान, जो कोणी लढतो त्यांना अशा गोष्टींना सामोरे जावे लागते. पण जरांगेंनी इतका मोठा लढा उभा केलाय त्याबद्दल त्यांचे कौतुक आहे. राजकीय वर्तुळात जी चर्चा होते तीच मी ऐकली आहे. मराठा आरक्षणासाठी ती व्यक्ती लढा देत असेल तर त्याचे कौतुक करायला हवे. एवढा मोठा लढा उभा करणे ही खाऊची गोष्ट नक्कीच नाही. परंतु जरांगे पाटलांवर ज्याप्रकारे पुष्पवृष्टी केली जाते. अडीचेशे जेसीबी लावून फुलं उधळली जातात ते जरांगेनीही स्वत:हून थांबवायला हवे. आपण आपल्या लढ्याला तत्वे ठेवली तर खरं कोण आणि खोटं कोण हे लोकांनाही कळते असं अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे.

## आंध्र प्रदेशात राजकीय उलथापालथ जगन मोहन रेड्डींची बहीण काँग्रेसमध्ये प्रवेश करणार

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**
**नवी दिल्ली**

तेलंगणा विधानसभा निवडणुकीत केसीआर यांच्या भारत राष्ट्र समिती या पक्षाला धक्का देत सत्ता काबीज केल्यानंतर काँग्रेसने आपला मोर्चा आता आंध्र प्रदेशकडे वळवला आहे. आगामी लोकसभा निवडणूक आणि आंध्र प्रदेश विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून काँग्रेसने रणनीती आखण्यास सुरुवात केली असून याचाच एक भाग म्हणून आता आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांची बहीण वायएस शर्मिला यांना पक्षात घेण्याचा निर्णय काँग्रेसकडून घेतला जाण्याची शक्यता आहे. वायएस शर्मिला या आठवड्यातच काँग्रेसमध्ये प्रवेश करतील, अशी माहिती समोर येत आहे. शर्मिला यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश झाल्यास पक्षविस्तारासाठी त्याचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे.



वायएस शर्मिला यांनी भाऊ जगन मोहन रेड्डी यांच्याशी राजकीय मतभेद झाल्यानंतर जुलै २०२१ मध्ये वायएसआर तेलंगणा पक्षाची स्थापना केली होती. मात्र शर्मिला यांच्या पक्षाने नुकतीच झालेली तेलंगणा विधानसभा निवडणूक लढवली नव्हती. ही निवडणूक काँग्रेस जिंकण्याच्या स्थितीत असल्यामुळे आम्ही न लढण्याचा निर्णय घेतला, असं तेव्हा त्यांच्याकडून सांगण्यात आलं होतं. त्यामुळे वायएस शर्मिला यांची काँग्रेससोबतची वाढती जवळीक चर्चेचा विषय ठरली होती आणि त्या लवकरच काँग्रेसमध्ये प्रवेश करतील, अशी शक्यता वर्तवण्यात येत होती. या चर्चेवर आता शिक्कामोर्तब होणार असून वायएस शर्मिला या काँग्रेसमध्ये प्रवेश करत आपला पक्षही विलीन करणार आहेत.

### काँग्रेसला होणार मोठा फायदा

जगन मोहन रेड्डी यांनी काँग्रेसमधून बाहेर पडत वायएसआर काँग्रेस पक्षाची स्थापना केल्यापासून आंध्र प्रदेशात काँग्रेसची स्थिती दिवसेंदिवस खराब होत गेली. सध्या आंध्र प्रदेशात सत्ताधारी वायएसआरसीपी विरुद्ध चंद्राबाबू नायडू यांच्या टीडीपीमध्ये राजकीय संघर्ष सुरू आहे. या संघर्षात बाजूला पडलेल्या काँग्रेसच्या मतांच्या टक्केवारी फारच कमी झाली आहे. त्यामुळे वायएस शर्मिला यांना पक्षात घेत काँग्रेसकडून मोठी जबाबदारी दिली जाण्याची शक्यता आहे. त्यांच्याकडे काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाची धुरा सोपवली जाईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.दरम्यान, वायएस शर्मिला यांच्या पक्षप्रवेशाने काँग्रेसला लोकसभा निवडणुकीसह आंध्र प्रदेश विधानसभा निवडणुकीतही चांगला फायदा होऊ शकतो. त्यामुळे आगामी काळात आंध्र प्रदेशच्या राजकारणात नेमक्या काय घडामोडी घडतात, हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

## इतर पक्षातील नेत्यांना पक्षात घेण्यासाठी समिती, लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाची खास रणनीती

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**
**नवी दिल्ली**

लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक आता अवघ्या काही महिन्यांवर आली आहे. या निवडणुकीत विजय मिळवून सलग तिसऱ्यांदा देशाची सत्ता मिळवण्यासाठी भाजपानं मोर्चेबांधणी सुरू केली आहे. त्यासाठी आज पक्षाच्या मुख्यालयामध्ये एक उच्चस्तरीय बैठक झाली. त्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यांचं नियोजन करण्यात आलं.

मिळत असलेल्या माहितीनुसार २२ जानेवारी रोजी अयोध्येमध्ये राम मंदिरामध्ये प्राणप्रतिष्ठापना सोहळा होणार आहे. या सोहळ्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अनेक राज्यांमध्ये झंझावाती सभा होतील. याशिवाय केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्या देशव्यापी दौऱ्यांबाबतही चर्चा करण्यात आली. त्याशिवाय बैठकीमध्ये जनतेला रामललांचं दर्शन घडवण्याबाबतची चर्चा करण्यात आली. तसेच प्रत्येक जिल्ह्यातून हजारो लोकांना राम मंदिराचं दर्शन घडवण्याबाबत नियोजन करण्यात आलं आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार इतर पक्षातील नेत्यांना पक्षात घेण्याबाबत विचार करण्यासाठी भाजपाने जॉयनिंग समितीची स्थापना केली आहे. ही समिती ज्या नेत्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करेल, त्यांनाच भाजपामध्ये प्रवेश दिला जाणार आहे. पार्टी मुख्यालयामध्ये झालेल्या बैठकीमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्यासह देशभरातील सुमारे १५० नेते सहभागी होती.

## राजू शेट्टी अचानक 'मातोश्री'वर, उद्धव ठाकरे यांच्यासोबत चर्चा; महाविकास आघाडीत येणार?

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**
**मुंबई**

लोकसभा निवडणुकीला अवघे तीन महिने उरले आहेत. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी आणि महायुतीची आपआपल्या मित्र पक्षासोबत जागा वाटपाची चर्चा सुरू आहे. जास्तीत जास्त जागा निवडून आणण्यासाठी या सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. महाविकास आघाडीचंही जागा वाटप अंतिम टप्प्यात आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडी आणि राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेला



आघाडीकडून प्रत्येकी एक जागा दिली जाणार असल्याची चर्चा आहे. ही चर्चा सुरू असतानाच आज माजी खासदार राजू शेट्टी यांनी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. त्यामुळे राजकीय चर्चांना उधाण आलं आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची मातोश्रीवर जाऊन भेट घेतली. या दोन्ही नेत्यांमध्ये अर्धा ते पाऊण तास चर्चा झाली. राजू शेट्टी हे हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून स्वाभिमानी शेतकरी पक्षाकडून उभे राहणार असल्याची माहिती आहे. पण राजू शेट्टी यांनी महाविकास आघाडीकडून उभं राहावं असा आघाडीचा प्रयत्न आहे. खासकरून ठाकरे गटाचा तसा प्रयत्न आहे. त्यावर उद्धव ठाकरे आणि राजू शेट्टी यांच्यात चर्चा झाल्याचं सांगितलं जात आहे.

## युती तोडण्यात आदित्य ठाकरेचा मोठा वाटा; दीपक केसरकर यांचा आरोप

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक कोल्हापूर**

शिवसेना भाजप युती तोडण्यामध्ये आदित्य ठाकरे यांचा मोठा वाटा असल्याचा आरोप शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी केला आहे. शिवसंकल्प अभियान तयारीसाठी ते कोल्हापुरात आले असता पत्रकारांशी बोलत होते.



केसरकर म्हणाले, ज्या मतदारसंघातून ज्या पक्षाचे खासदार निवडून आलेत. त्यांना तिथे पुन्हा उमेदवारी दिली जाते. हे गेली काही वर्षे पाळले गेलेले सूत्र आहे. त्यानुसार कोल्हापूर, हातकणंगले मतदारसंघ आमच्याकडे राहतील. परंतू याचा अंतिम निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पातळीवर होईल.

तसेच आमच्या शिवसेनेचे राज्यभरातील प्रतिनिधी कोल्हापूर येथे होणाऱ्या अभियानासाठी येणार आहेत. तर कार्यकर्ते आणि नागरिकांसाठी स्वतंत्र जाहीर सभा होणार आहे. लोकसभेचे अधिवेशन एक दिवस अलिकडे आल्याने अजूनही तारीख निश्चित झालेली नाही असं अभियानावर केसरकर म्हणाले.

## टोक्योमधील हानेडा विमानतळावर दोन विमानांची धडक, ३७९ प्रवाशांना घेऊन जाणारं विमान पेटलं



**दि.२विदर्भ प्रजासत्ताक :** जपानची राजधानी टोक्योमधील हानेडा विमानतळावर मोठी दुर्घटना घडली आहे. जपान एअरलाईन्सच्या एका विमानाला आग लागल्याच्या घटनेने खळबळ उडाली आहे. विमानतळावरील कर्मचारी आणि अग्निशमन दलाकडून आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न चालू आहेत. धावपट्टीवर धावत्या विमानाने पेट घेतल्याचे व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहेत.

## संपादकीय ......

# जन्मदर कमी होऊनही लोकसंख्या झपाट्याने वाढतीये?

*लोकसंख्येचा बाबतीत भारत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचला आहे. आता प्रश्न आहे की जगाची लोकसंख्येचा नेमका आकडा किती आहे. जानेवारी २०२४ पासून जगाची लोकसंख्या ८ अब्जांच्या पुढे जाईल. अमेरिकेच्या सेन्सस ब्युरोने आपल्या अहवालात हा दावा केला आहे. अहवाल सांगतो की गेल्या वर्षभरात जगाच्या लोकसंख्येमध्ये सुमारे ७.५ कोटींनी वाढ झालीये. अहवालानुसार, जगात दर सेकंदाला ४.३ लोक जन्माला येतात, तर दर सेकंदाला २ लोकांचा मृत्यू होतो. यूएस सेन्सस ब्युरोनुसार, १ जानेवारी २०२४ ला जगाची एकूण लोकसंख्या ८.०२ अब्ज असेल. १ जानेवारी २०२३ ला हा आकडा ७.९४ अब्ज होता. नोव्हेंबर २०२२ मध्ये, यूएनचा अंदाज होता की जगाची लोकसंख्या ८ अब्ज इतक होईल. लोकसंख्या १ अब्जने वाढण्यास सुमारे ११ वर्षे लागली.*

*संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस अँटोनियो जुटारेस यांनी लोकसंख्येच्या वाढीचे श्रेय वैज्ञानिक यश, पोषण, आरोग्य आणि स्वच्छता सुविधांमध्ये सुधारणांना दिलंय. यूएस सेन्सस ब्युरोनुसार, २६ सप्टेंबर २०२३ ला जगाची लोकसंख्या ८ अब्जांवर पोहचली. यूएस ब्युरोनं म्हटलं होतं की त्यांची आकडेवारी यूएनपेक्षा वेगळी आहे, कारण काही देशांमध्ये जन्म आणि मृत्यू दर मोजण्यासाठी योग्य यंत्रणा नाही. लोकसंख्या ९ अब्जांपर्यंत पोहोचण्यासाठी सुमारे १४ वर्षे लागतील, अशी भीती सेन्सेक्स ब्युरोने व्यक्त केलीये. त्याच वेळी, लोकसंख्या १० अब्जांपर्यंत पोहोचण्यासाठी आणखी १६.४ वर्षे लागू शकतात. सेन्सेक्स ब्युरोनुसार, लोकसंख्या वाढीच्या दरात घट होण्याचं कारण म्हणजे कमी प्रजनन दर आहे.*

*सध्या जगात तरुणांची संख्या कमी आहे, ज्याचा थेट परिणाम लोकसंख्येवर होत आहे. याशिवाय कोरोना महामारीचा लोकसंख्या वाढीवरही विपरीत परिणाम झाला आहे. महामारीमुळे, जागतिक आयुर्मान म्हणजेच लोकांचे सरासरी वय २०२१ मध्ये ७१ वर्षे इतकं कमी झालंय. सेन्सेक्स ब्यूरोने आपल्या अहवालात म्हटले आहे की १ जानेवारी २०२४ ला अमेरिकेची लोकसंख्या सुमारे ३३५.९ दशलक्ष होईल. १ वर्षात सुमारे १७.५९ लाखांची वाढ नोंदवली गेलीये. अहवालानुसार, जानेवारी महिन्यात अमेरिकेत दर ९ सेकंदाला एका मुलाचा जन्म होईल. त्याच वेळी, दर ९.५ सेकंदाला एका व्यक्तीचा मृत्यू होईल.*

*आकडेवारीनुसार, १९५१ मध्ये एका महिलेने सरासरी ५ मुलांना जन्म दिला. आता २०२१ मध्ये हा आकडा २.५ वर आला आहे. गेल्या ७० वर्षांत जन्मदर निम्म्यावर आला आहे. त्यामुळे आता प्रश्न पडतो की जन्मदर निम्मा असतानाही जगाची लोकसंख्या एवढ्या वेगाने कशी वाढली? जन्मदर हा लोकसंख्येच्या अर्ध्याच गोष्टी सांगतो. जेव्हा आपण मृत्यू दर पाहतो तेव्हा आपल्याला असे आढळून येते की आता दरवर्षी १ हजार लोकांपैकी ७.६० लोकांचा मृत्यू होतो, तर १ हजार लोकांमध्ये दरवर्षी सुमारे १८ लोकांचा जन्म होतो. म्हणजे जन्मदराचा आकडा मृत्यूदराच्या २ पट जास्त आहे. लोकसंख्या वाढण्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे.*

*एप्रिल २०२३ मध्ये भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला. संयुक्त राष्ट्राच्या सेन्सेक्स ब्युरोनं आपल्या अहवालात ही माहिती दिली. त्यानुसार भारताची लोकसंख्या चीनच्या लोकसंख्येपेक्षा ३० लाख अधिक होती. युएन १९५० पासून जागतिक लोकसंख्येशी संबंधित डेटा जारी करत आहे. त्यानंतर पहिल्यांदाच भारताची लोकसंख्या चीनपेक्षा जास्त आहे. २०२२ मध्ये यूएनच्या आधीच्या अहवालानुसार, २०५० पर्यंत जगातील निम्मी लोकसंख्या केवळ ८ देशांमध्ये असेल. यामध्ये काँगो, इजिप्त, इथिओपिया, भारत, पाकिस्तान, नायजेरिया, फिलीपिन्स आणि टांझानिया यांचा समावेश आहे. सध्या, ४६ देशांची लोकसंख्या सर्वात वेगाने वाढत आहे, त्यापैकी ३२ देश उप-सहारा आफ्रिकेत आहेत. असा अंदाज आहे की २०५० पर्यंत जगातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या या भागात राहतील. दुसरीकडे, असे ६१ देश आहेत ज्यांची लोकसंख्या २०२२ ते २०५० दरम्यान कमी होईल. त्यापैकी सर्वाधिक देश हे युरोपातील आहेत.*

# ट्रकचालकांच्या संपामुळे एसटी भोपाळमध्ये अडकली आंतरराज्य वाहतूक खोळंबली, १० फेऱ्या विस्कळीत

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

केंद्र सरकारने अपघाताबाबत बनवलेला कायदा अन्यायकारक असल्याने ट्रक व अन्य खासगी वाहन चालकांनी संप पुकारला असून ठिकठिकाणी रास्तारोको आंदोलन सुरू केले आहे. याचा फटका राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसेसनाही बसला आहे.अमरावती विभागातून आंतरराज्य वाहतुक करणाऱ्या १० फेऱ्यांची वाहतुक यामुळे खोळंबली आहे. तर अमरावती येथून भोपाल येथे पोहोचलेली एसटी बस मात्र या आंदोलनामुळे अडकल्याची माहिती महामंडळाच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी दिली.



> हीट ॲण्ड रण कायद्या विरोधात खासगी वाहतुक करणाऱ्या चालकांनी आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनामुळे एसटी महामंडळाच्या अमरावती विभागातून मध्यप्रदेशात जाणाऱ्या फेऱ्याच विस्कळीत झाल्या आहेत. यामुळे या फेऱ्या जिल्हातंर्गत वाहतुकीसाठी वळविल्या आहेत. इतर सर्व वाहतुक सुरळीत सुरू असून महामंडळाचे कुठलेही आर्थिक नुकसान झालेले नाही.
>
> **– योगेश ठाकरे, प्रभारी विभागीय वाहतुक अधिकारी, रा.प.म.अमरावती विभाग**


अमरावती विभागातून दररोज अमरावती खंडवा, इंदौर, बऱ्हाणपूर, मुलताई, छिंदवाडा, भोपाळ, बैतुल या मध्यप्रदेशातील आदी ठिकाणी एसटी बसेसव्दारे प्रवाशी वाहतुक केली जाते. अशातच केंद्र सरकारच्या हीट एड रण केसेस कायद्यांतर्गत अपघात झाल्यानंतर ड्रायव्हरला दहा वर्ष शिक्षा व ७ ते १० लाखापर्यंत दंड या कायद्या अंमलात आणण्याचा निर्णय घेतल आहे. मात्र हा कायदा हा चालकांवर अन्याय करणारा त्यामुळे हा कायदा केंद्र शासनाने त्वरील रद्द करावा ट्रक चालक,मालक तसेच अन्य खासगी वाहन चालकांनी १ जानेवारी पासून संप पुकारत आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनामुळे राज्य परिवहन महामंडळाच्या आंतरराज्य वाहतुक फेऱ्या या आंदोलनामुळे विस्कळीत झाल्या आहेत. परिणामी अमरावती विभागामधून मध्यप्रदेशात जाणाऱ्या जवळपास १० फेऱ्या विस्कळीत झालेल्या आहेत. परिणामी एसटी महामंडळाने या एसटी बसेसच्या फेऱ्या जिल्हातंर्गत फेऱ्यामध्ये वळविल्याची माहिती एसटी महामंडळाच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दिली. केवळ अमरावती ते भोपाल ही बस फेरी रास्तरोको आंदोलनामुळे भोपाल येथे रोखण्यात आली आहे.

## सव्वा किलो सोन्या-चांदीचे दागिने जप्त; कर्मचाऱ्यांनीच केली सराफाकडे चोरी

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक नागपूर:**

सराफा दुकानातील चोरी केलेले एक किलो ३०० ग्रॅम सोने - चांदीचे दागिने तहसिल पोलिसांनी जप्त केले. जप्त मुद्देमालाची किंमत ८६ लाख १८ हजार रुपये आहे. न्यायालयाच्या आदेशाने सर्व महिलांची कारागृहात रवानगी करण्यात आली. अशी माहिती पोलिस उपायुक्त गोरख भामरे यांनी प्रसार माध्यमांना दिली. अस्मिता उर्फ स्वाती लुटे (३९) रा. वर्धमाननगर, प्रिया राउत (३०) रा. पवनगाव रोड, पुजा भानारकर (२०) रा. पाचपावली, कल्याणी खळतकर (३३) रा. नंदनवन, भाग्यश्री इंदनकर (३०) आणि मनीषा मोहुर्ले (३८) अशी अटकेतील महिलांची नावे आहेत.

# उद्याला राहणार पृथ्वीचे सूर्यापासून सर्वांत कमी अंतर



**दि.२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

पृथ्वी सूर्याभोवती फिरते; परंतु अचूक वर्तुळाकार मार्गाने फिरत नाही तर लंब वर्तुळाकार मार्गाने फिरत असते. कधी सूर्यापासून लांब असते, तर कधी सूर्यापासून जवळ असते. साधारणपणे ३ जानेवारीदरम्यान पृथ्वी ही सूर्यापासून सर्वांत कमी अंतरावर असते. हे अंतर १४.७१ कोटी कि.मी. राहत असल्याची माहिती खगोलतज्ज्ञांनी दिली.

नेहमी हे अंतर सरासरी १५ कोटी किमीदरम्यान असते. या दिवशी पृथ्वी जुलै महिन्याच्या तुलनेत ५० लाख कि.मी. ने सूर्याच्या जवळ राहणार आहे. पृथ्वी व सूर्य यांच्यातील अंतर कमी असण्याच्या घटनेला 'उपसूर्य' असे म्हणतात. सूर्य हा तप्त वाळूचा गोळा असून यामध्ये हायड्रोजनपासून हेलियम बनण्याची क्रिया अहोरात्रसुरू राहते. सूर्याच्या केंद्रामध्ये एका सेकंदात ६५ कोटी ७० लाख टन हायड्रोजन जळतो व त्यापासून ६५ कोटी २५ लाख हेलियम तयार होत असल्याचे खगोलतज्ज्ञांनी सांगितले.

हा शोध सन १९३९ मध्ये हॅन्स बेथ या वैज्ञानिकाने लावला. सूर्यावर ज्या भागावर तापमान कमी होते त्या भागावर सौर डाग पडतात. या डागाचे चक्र ११ वर्षांचे असते. या डागाचा शोध सन १९८३ मध्ये श्वाबे नावाच्या वैज्ञानिकांनी लावला आहे. या डागाचे आतापर्यंत २३ चक्र पूर्ण झाले. फेब्रुवारी २००८ पासून २४ वे चक्र सुरू झाले आहे. या खगोलीय घटनेचा मानवी जीवनावर कोणताही परिणाम होणार नसल्याची माहिती मराठी विज्ञान परिषदेचे विभागीय अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी दिली.

# नवीन वीजजोडणी तात्काळ उपलब्ध होणार

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

कृषिपंप वगळून उर्वरित सर्व वर्गवारीतील ग्राहकांना तात्काळ नवीन वीजजोडणी किवा वीजभार वाढवून देण्यासाठी आवश्यक पायाभूत वीजयंत्रणा उभारण्याचे काम महावितरणकडून करण्यात येत आहे. त्यामुळे वीजग्राहकांना तात्काळ नवीन वीजजोडणी उपलब्ध होणार आहे. त्यासाठी नवीन वीजजोडणीसाठी नवीन सेवा जोडणी योजनेचा पर्याय ग्राहकांना सर्वप्रथम देण्यात यावा तसेच कृती मानकांप्रमाणे निश्चित केलेल्या कालावधीत सेवा देण्यात यावी असे सक्त निर्देश महावितरणकडून क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले आहे.कृषिपंप वगळून नवीन वीजजोडण्या देण्यासाठी नवीन सेवा जोडणी, नॉन डीडीएफ ग्राहक योगदान व परतावा तसेच समर्पित वितरण सुविधा अशा तीन योजना अस्तित्वात आहेत. यामध्ये वीजग्राहकांना नवीन वीजजोडणी देण्यासाठी नवीन सेवा जोडणी योजना महत्वाची आहे. या योजने अंतर्गत नवीन वीजजोडणी देणे किवा वीज भार कमी अधिक करण्यासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर आवश्यक पायाभूत सुविधांची व यंत्रणेची कामे महावितरणकडून करण्यात येतील. त्यासाठी ग्राहकास कोणताही खर्च करावा लागणार नाही. तर केवळ सेवा जोडणी शुल्क व सुरक्षा ठेव रक्कम भरावी लागेल. राज्यात काही ठिकाणी नवीन सेवा जोडणीच्या पर्यायाची माहिती ग्राहकांना देण्यात येत नसल्याचे प्रकार समोर आले आहेत. त्याची महावितरणने गंभीर दखल घेत नुक्तेच एक परिपत्रक जारी केले आहे. त्यामध्ये नवीन वीजजोडणीसाठी नवीन सेवा जोडणी योजनेचा ग्राहकांना सर्वप्रथम पर्याय देण्यात यावा असे सक्त निर्देश देण्यात आले आहे.



## दर्यापूर पंचायत समितीत प्रहारचे घोंगडीसह मुक्काम आंदोलन

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

ग्रामपंचायत अंतर्गत येवदा येथील विविध समस्या निकाली काढण्याकरीता प्रहारच्या वतीने सोमवारी दर्यापूर पंचायत समिती येथे गटविकास अधिकारी यांच्या दालनात घोंगडीसह मुक्काम आंदोलन केले. त्यामुळे प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली होती.

येवदा ग्रामपंचायत येथील जनतेला भेडसावणाऱ्या विविध नागरी मूलभूत सेवा सुविधा,समस्या सोडवण्याबाबत अनेक वेळा ग्रामपंचायत, दर्यापूर समिती प्रशासन, जिल्हा प्रशासन यांना वेळोवेळी निवेदने सादर करून सुद्धा गावातील समस्यांचा निपटारा करण्यात आला नाही त्यामुळे संतप्त प्रहारचे कार्यकर्ते झाल्याने सोमवारी पंचायत समितीवर धडकले होते. यावेळी गटविकास अधिकारी यांचे दालनात घोगंडी घेवून मुक्काम आदोंलन करण्यात आले. अधिकाऱ्यांनी प्रकरणाचा निपटारा करावा ही मागणी यावेळी आदोंलन कत्यांनी रेटली. गट विकास अधिकारी विनोद खेडकर, सह गटविकास अधिकारी चंद्रशेखर ढवक, ग्रामसेवक बबन कोलो, विस्तार अधिकारी संदीप देशमुख,मिलिंद टुणूकले यांनी आंदोलकांची समजुत काढण्याचा प्रयत्न केला. परंतु गावातील समस्या निकाली निघेपर्यंत येथुन हटणार नाही अशी भुमिका आंदोलकांनी घेतली होती.



आंदोलनामध्ये प्रहार पक्षाचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रदीप वडतकर, विलास कैसर, सुयोग टोबरे, डॉ दिनेश म्हाला, बापूसाहेच साबळे, प्रविण कासारकर, पंकज कैकाडे, साबीर इनामदार, हिरालाल इंगळे, रामकृष्ण टाले, गुड्डू जहागीरदार, रहीम शहा, उमेश शिंदे, पुरण मोहोड, मनोहर मोहोड यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते आंदोलनात सहभागी होते.





## कोथिंबीर अवघ्या दोन दिवसांत सडून खराब होतेय? मग वापरा 'या' सोप्या ट्रिक्स, आठवडाभर राहील हिरवीगार

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक आहार विशेष**

कोथिंबीर आपल्या रोजच्या आहारातील एक महत्वाचा घटक आहे. मसालेदार भाजी किंवा इतर अनेक गरमागरम पदार्थांवर कोथिंबीर भुरभुरून घातली तर पदार्थाची चव आणखी वाढते. त्यामुळे रुचकर, स्वादिष्ट जेवणासाठी हिरवी कोथिंबीर अतिशय फायदेशीर असते. दरम्यान, हिवाळ्यात कोथिंबीर मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. त्यामुळे अवघ्या १० रुपयांत आपण बाजारातून कोथिंबीरची मोठी जुडी विकत आणतो. पण, ती साफ करून फ्रीजमध्ये व्यवस्थित न ठेवल्यास अवघ्या दोन दिवसांत सडून खराब होते. अशावेळी ती टाकून देण्याशिवाय पर्याय उरत नाही; त्यामुळे कोंथिबीर जास्त दिवस टिकून ठेवण्यासाठी तुम्हाला अशा काही सोप्या टिप्स सांगणार आहोत, ज्याचा तुम्हाला फायदा होऊ शकतो.

कोथिंबीर जास्त दिवस ताजी ठेवण्यासाठी वापरा 'या' सोप्या टिप्स–

१) कोथिंबीर नीट कापून स्टोर करा : कोथिंबीर जास्त दिवस ताजी, हिरवीगार ठेवण्यासाठी ती नीट कापून हवाबंद डब्यात ठेवा. यामुळे कोथिंबीरचे शेल्फ लाइफ वाढेल. कोथिंबीरची मुळं कापून टाका, त्यानंतर धुवून नीट वाळवा. आता तुमच्या पद्धतीने ती कट करून घ्या. यानंतर कट केलेली कोथिंबीर हवाबंद डब्यात ठेवा. अशा प्रकारे कोथिंबीर दोन आठवडे ताजी राहू शकते.

२) झिप-लॉक बॅग वापरा : कोथिंबीर हिरवीगार ठेवण्याची सोप्पी ट्रिक म्हणजे ती झिप लॉक बॅगमध्ये ठेवणे. जर तुमच्याकडे झिप-लॉक बॅग नसेल तर ती पटकन विकत घेऊ शकता. सर्वप्रथम कोथिंबीर धुवून तिची मुळं कापून टाका. कोथिंबीरच्या पानांवरील पाणी पूर्णपणे निघाले की, ती व्यवस्थितपणे झिप-लॉक बॅगमध्ये भरा आणि फ्रीजमध्ये ठेवा.

३) क्लिंग फिल्म वापरा : कोथिंबीर ताजी ठेवण्याची आणखी एक सोप्पी ट्रिक म्हणजे ती क्लिंग रॅपमध्ये गुंडाळणे. कोथिंबीर कोमेजू नये यासाठी क्लिंग फिल्म वापरा. त्यात कोथिंबीर



गुंडाळून फ्रीजमध्ये ठेवा. असे केल्याने कोथिंबीर आठवडाभर ताजी, टवटवीत राहते.

४) प्लास्टिकच्या डब्यात ठेवा : कोथिंबीर खरेदी केल्यानंतर तिची मुळं कापून टाका आणि त्यानंतर स्वच्छ करा, आता कोथिंबिरीची पानं स्वच्छ धुवून झाल्यानंतर एका कापडावर सुकत टाका. कोथिंबीरमधील पाणी सुकल्यानंतर स्वच्छ प्लास्टिकच्या डब्यात ठेवा आणि टिश्यू पेपरने झाकून झाकण बंद करा. अशा प्रकारे कोथिंबीर दोन आठवडे हिरवीगार राहू शकते.

५) पाण्यात भिजवा : कोथिंबीर ताजी ठेवण्याची आणखी एक ट्रिक म्हणजे ती स्वच्छ करून पाण्यात भिजवणे. यासाठी एक ग्लास अर्धा पाण्याने भरा आणि कोथिंबीर मुळापासून ग्लासमध्ये टाका. दररोज पाणी बदला आणि ग्लास रेफ्रिजरेटरमध्ये ठेवा. या पद्धतीने कोथिंबीर तीन आठवडे ताजी ठेऊ शकता.

# भापकी, पळसवाडा, हातुर्णा येथील ३७० घरकुलांसाठी ६ कोटी १० लक्ष ५० हजार रुपये मंजूर

## आमदार देवेंद्र भुयार यांच्या पाठपुराव्यामुळे पूरग्रस्तांना मिळाला दिलासा

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक वरूड**

वरुड तालुक्यातील भापकी पाळसोना हातुर्णा येथील पुनर्वसन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार देवेंद्र भुयार यांनी शासंकडे अनेक वेळा पुनर्वसित गावातील नागरिकांची घरकुले, नागरी सुविधा यासह विवीध कामांसाठी शासनाकडे अनेक वेळा बैठका घेऊन सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांना सोबत घेऊन भापकी, पाळसोना, हातुर्णा यासह पूरग्रस्त गावातील गाव अंतर्गत रस्ते, नाल्या, पानाच्या टाक्या, वीज कनेक्शन, पेव्हर ब्लॉक, पाण्याच्या पूरक पाईप लाईन, इतर नागरी सुविधा निर्माण करण्यासाठी भापकी पाळसोना हातुर्णा येथील नागरिकांना न्याय मिळऊन दिलासा देण्यासाठी पुढाकार घेतल्यामुळे ३७० घरकुलांसाठी ६ कोटी १० लक्ष ५० हजार रुपयांच्या निधीची तरतूद करून प्रशासकीय मान्यता मिळाल्यामुळे भापकी पाळसोना हातुर्णा येथील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



मोवाड महापुरामुळे सन १९९१ चे पावसाळ्यात प्रचंड महापुर आलेल्या महापुरामुळे वरूड तालुक्यातील भापकी, पळसवाडा, हातुर्णा ही ३ गावे पुर्णत: बाधित झाल्यामुळे या गावातील ३७० घरांचे सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन करणेसाठी तात्काळ प्रशासकीय मान्यता प्रदान करुन घरकुलांची कामे पुर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी आमदार देवेंद्र भुयार उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे रेटून धरल्यामुळे आमदार देवेंद्र भुयार यांच्या मागणीची दखल घेऊन भापकी, पळसवाडा, हातुर्णा या गावातील ३७० घरांचे सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन करणेसाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असल्यामुळे भापकी, पळसवाडा, हातुर्णा येथील नागरिकांना दिलासा मिळऊन दिल्यामुळे येथील नागरिकांनी आमदार देवेंद्र भुयार यांचे आभार मानले.

सन १९९१ च्या पुरामुळे बाधित झालेल्या अमरावती जिल्हयामधील वरुड तालुक्यातील हातुर्णा येथील १६७ घरकुलांसाठी २ कोटी ७५ लक्ष ५५ हजार रुपये, पळसवाडा येथील १०२ घरकुलांसाठी १ कोटी ६६ लक्ष ६५ हजार रुपये , भापकी येथील १०१ घरकुलांसाठी १ कोटी ६८ लक्ष ३० हजार रुपये, असे एकूण ३७० घरकुलांसाठी ६ कोटी १० लक्ष ५० हजार रुपये मंजूर करून या सर्व मंजूर घरांचे एक विशेष बाब म्हणून त्यांचे नवीन सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन करण्यासाठी भूसंपादित केलेल्या ठिकाणी पुनर्वसन करण्यास व त्यानुसार घरबांधणीसाठी ६ कोटी १० लक्ष ५० हजार रुपये इतक्या खर्चास शासनाने शासन निर्णय काढून मंजुरी दिल्याची माहिती आमदार देवेंद्र भुयार यांनी यावेळी दिली .

# अमरावती जिल्ह्यात आठ हजार ट्रक, टँकरची चाके थांबली; 'हिट न्ड रन' कायद्याला विरोध



**दि.२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

केंद्र सरकारकडून वाहन चालक-मालकांसाठी प्रस्तावित असलेल्या 'हिट न्ड रन' या कायद्याला रोड ट्रान्सपोर्ट फ्रेटरनिटीने तीव्र विरोध केला आहे. त्याअनुषंगाने सोमवारपासून संप पुकारण्यात आला असून, अमरावती जिल्ह्यातील सुमारे आठ हजार ट्रक- टँकरची चाके थांबली आहेत. हा अन्यायकारक कायदा मागे घ्यावा, या मागणीसाठी नागपुरी गेट ते जिल्हा कचेरीपर्यंत दुचाकी रॅली काढण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केंद्र सरकारकडे निवेदन पाठविण्यात आले.

गृहमंत्री अमित शहा यांच्या नावे देण्यात आलेल्या निवेदनातून केंद्र सरकारने २८ जानेवारी २०२३ रोजी लोकसभा अधिवेशनात वाहन चालक-मालकांसाठी एक अध्यादेश पारित केला आहे. यात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत 'हिट न्ड रन' अन्वये वाहनाच्या अपघातात एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास वाहन चालकाला सात लाखांचा भुर्दंड द्यावा लागेल अथवा दहा वर्षांच्या शिक्षेची तरतूद आहे.

वाहन चालकांसाठी हा नवा कायदा अन्यायकारक असल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे. ऑल इंडिया ट्रान्सपोर्ट काँग्रेस आणि युनायटेड फ्रंड राष्ट्रीय मोर्चा या देशातील दोन मोठ्या ट्रान्सपोर्ट संघटनाच्या बॅनरखाली ट्रान्सपोर्टर, ट्रक चालक-मालकांनी देशव्यापी संप पुकारला आहे. यात जिल्ह्यातील सात हजार ट्रान्सपोर्ट व्यावसायिक, पाचशे पेट्रोल-डिझेल टँकर चालक-मालक यासह १६० मालधक्का ट्रक चालक-मालकांचा समावेश आहे. तसेच या संपात प्रमुख सात वाहन चालक-मालक संघटना सहभागी झाल्या आहेत. त्यामुळे जागोजागी ट्रक, टँकर व अन्य वाहनांची चाके थांबलेली आहेत.

# संपाचा फटका, रेशन मिळेना; १ हजार ९१४ दुकानांना टाळे

## विविध मागण्यांसाठी स्वस्त धान्य दुकानदार एकवटले



**दुकाने : १९१४**
**एकूण कार्डधारक : ६ लाख १६ हजार ९१**
**लाभार्थी : २४ लाख ४८ हजार ५२१**
**मिळणारे कमिशन : १०० किलो विक्रीला १५० रुपये**

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

रेशनवर स्वस्त आणि मोफत वस्तू देण्याच्या घोषणा दिवसेंदिवस वाढत आहेत. या साहित्याच्या वितरणाची जबाबदारी असलेल्या रेशन दुकानदारांची यामुळे कोंडी होत आहे. तुटपुंजे कमिशन, 'पीओएस' मशिनमध्ये सतत होणारा बिघाड, सुविधांचा अभाव यामुळे त्रस्त झालेल्या रेशन दुकानदारांनी १ जानेवारीपासून ऑल इंडिया फेअर प्राइज शॉप डिलर्स फेडरेशन यांच्या नेतृत्वात अमरावती जिल्हा प्राधिकृत स्वस्त धान्य दुकानदार व किरकोळ केरोसिन परवानाधारक वेलफेअर संघाने बेमुदत संप पुकारला. या आंदोलनामुळे नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी जिल्ह्यात रेशनवरील वस्तू लाभार्थ्यांना मिळणे कठीण झाले आहे.

देशात सर्वसामान्य जनतेला रेशनवर स्वस्त धान्य वितरित केले जाते. याचा लाभ लाखोंपेक्षा अधिक जनतेला होतो. निवडणुकीच्या काळात अशा दुकानांतून अधिकाधिक वस्तू देण्याची घोषणा होते. मात्र, वितरकांकडे दुर्लक्ष होत असल्याने त्यांच्यात अस्वस्थता निर्माण झाली आहे. पूर्वी या वितरकांना चांगले कमिशन होते. आता मात्र विक्री ऑनलाइन झाल्याने त्यावर मर्यादा आल्या आहेत. 'फाइव्ह जी'च्या जमान्यात 'टू जी'ची यंत्रणा असलेल्या पॉश मशिन दिल्या आहेत. 'एक देश, एक रेशन' उपक्रमासाठी सुविधांचा अभाव आहे. तुटपुंजे कमिशन, इतर वस्तू विक्रीसाठी नसलेली परवानगी, वाढत असलेले लाभार्थी, अन्न सुरक्षा व मोफत धान्य वाटप, 'आनंदाचा शिधा'सारख्या नवनवीन योजना वाढत असल्या, तरी दुकानदारांच्या पदरात फारसे काही पडत नसल्याने ते अस्वस्थ आहेत. सरकारकडे मागण्यांची दखल न घेतल्याने रेशन दुकानदारांनी अखेर देशव्यापी विक्री बंदचे हत्यार उपसले आहे. १ जानेवारीपासून जिल्हाभरातील यामुळे १९१४ दुकानांना टाळे लागले आहे. जोपर्यंत मागण्या मान्य होणार नाहीत तोपर्यंत संप सुरू राहणार असल्याची माहिती प्राधिकृत स्वस्त धान्य दुकानदार संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश उल्हे पाटील यांनी दिली.

# विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता महिलांना मिळणार व्यावसायिक प्रशिक्षण

**दि.२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

महापालिका प्रशासनाच्या वतीने विधवा, घटस्फोटित व परित्यक्ता महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी 'स्वयं आधार-टप्पा २' योजना प्रस्तावित करण्यात आली आहे. त्या अंतर्गत या महिलांना दोन महिने कालावधीचे व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यासाठी महिलांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. कुटुंबातील कर्ता असलेल्या व्यक्तीचा अकाली मृत्यू झाल्याने विधवा (एकल) झालेल्या महिला, घटस्फोटित, परित्यक्ता यांच्याकडे अर्थाजनाचे साधन नसल्याने त्यांना स्वतःसह मुलांचे आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांचे पालनपोषण करण्याकरिता मोठ्या प्रमाणात अडचणी येत असतात. परिणामी, त्यांच्यात एकप्रकारे सामाजिक व धार्मिक असुरक्षितता निर्माण होते. त्यामुळे त्यांच्यात सामाजिक व आर्थिक सुरक्षितता निर्माण करून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी ही योजना प्रस्तावित करण्यात आली आहे. त्याद्वारे त्यांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करून आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेंतर्गत ३०० महिलांना दोन महिने कालावधीचे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षणादरम्यान प्रोजेक्ट रिपोर्ट प्रकल्प अहवाल तयार करुन कर्ज प्रकरण बँकेकडे सादर करण्यात येईल.

# भीमा कोरेगावचा इतिहास ७० देशात पोहचवणार : एम.एस.बहल

## सायन्सकोर येथे मानवंदना देण्यासाठी उसळला भीमसागर



**दि.२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

कोरेगाव (भीमा) येथे पेशव्यांविरोधात झालेल्या संघर्षात पाचशे महार सैनिकांनी मिळविलेला ऐतिहासिक विजय हा आपल्या शक्तीचा आणि पराक्रमाचा विजय आहे. देशविदेशात आपले समाजबांधव मोठ्या संख्येने वास्तव्यास आहेत आणि त्यांनाही त्यांच्या पूर्वजांच्या पराक्रमाचा इतिहास माहीत व्हावा यासाठी भीमा कोरेगावच्या पराक्रमाचा इतिहास इंग्लड सह सत्तर देशात पोहचवणार असा दृढ संकल्प इंग्लंड येथून आलेले भीम अनुयायी एम.एस. बहल यांनी सोमवारी सायन्सकोर मैदान येथे अयोजित मानवंदना कार्यक्रमाच्या धम्मपिठावरून बोलतांना केला. गत बारा वर्षांपासून लॉर्ड बुद्ध त्रिवारवंदन संघ व भीमा कोरेगाव विजयस्तंभ प्रतिकृती मानवंदना आयोजन समितीयांच्या संयुक्त विद्यमाने सायन्सकोर मैदान याठिकाणी शौर्य दिवस साजरा करून भीमा कोरेगाव विजयस्तंभास मानवंदना देण्याचा कार्यक्रम हजारो अनुयायांच्या उपस्थितीत पार पडतो.द्विशतकीय भीमा कोरेगाव विजयस्तंभ प्रतिकृतीला मानवंदना देण्यासाठी सोमवारी सायंकाळी येथील सायंस्कोर मैदानात हजारोंच्या संख्येने निळा जनसागर उसळला होता. सायंकाळी मान्यवरांच्या उपस्थितीत भीमा कोरेगाव विजयस्तंभाच्या प्रतिकृतीला मानवंदना देण्याचा कार्यक्रम पार पडला. बुध्द शरणं गच्छामी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो असा गगनभेदी घोषणांनी आसमंत दुमदुमला होता.

लॉर्ड बुद्ध त्रिवारवंदन संघ व भीमा कोरेगाव विजयस्तंभ प्रतिकृती मानवंदना आयोजन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने १ ते ३ जानेवारी या कालावधीत स्थानिक सायंस्कोर मैदानात शौर्य दिनाचे अयोजन करण्यात आले आहे. द्विशतकीय मानवंदनेच्या तीन दिवसीय कार्यक्रमाला सोमवार पासून प्रारंभ झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभ सामूहिक बुध्दवंदना झाल्यानंतर भीमा कोरेगाव विजयस्तंभाच्या प्रतिकृतीला समता सैनिक दल, माजी सैनिक, भीमसैनिक यांनी मानवंदना दिली. यावेळी धम्मपिठावर कमलताई गवई,डॉ.राजेंद्र गवई, अनिल भटकर, सुखचंद राम, गंगाधर राऊत, अरुण आठवले, मंदाकिनी बागडे, बी.आर. धाकडे,अनिल बागडे,शिवा प्रधान रामकृष्ण तायडे,राजेंद्र नितनवरे,वसंतराव गवई,व्ही.एम. वानखडे ,समाधान वानखडे,मनोहर तायडे,सिद्धार्थ शेंडे,संतोष केशरवानी,राजू राठी,संजय थोरात,सुभाष मोरे,राहुल मेश्राम आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. डॉ. राजेंद्र गवई यांनी या मानवंदना कार्यक्रमाच्या अयोजनाबद्दल कैलाश मोरे यांचे अभिनंदन करत त्यांचा सपत्नीक सत्कार केला. उपविभागीय अधिकारी यांनी यावेळी बोलताना म्हटले की शक्ती आणि बुद्धीचा आपल्याला इतिहास आणि वर्तमान आहे त्यामुळे प्रत्येकाने या दोन्ही गोष्टींचा चांगल्या कार्यासाठी वापर करावा.यावेळी हजारोंच्या संख्येने निळा जनसमुदाय याठिकाणी जमला होता. मानवंदना कार्यक्रमानंतर सप्तखंजेरीवादक तुषार सुर्यवंशी, पवन दवंडे, अशोक निकाळजे व कुणाल वैराळे यांचा समाजप्रबोधनाचा कार्यक्रम पार पडला.

### बेलोरा येथे कायमस्वरूपी विजयस्तंभ

अमरावती येथे १२ वर्षांपासून विजयस्तंभ मानवंदना कार्यक्रम यशस्वीपणे अमरावतीला राबविण्यात येतो.त्या अनुषंगाने बेलोरा विमानतळ जवळ अडगाव खुर्द याठिकाणी धम्मशांती विपश्यना मेडिटेशन सेंटरची निर्मिती करण्यात येणार असून त्याठिकाणी कायमस्वरूपी विजयस्तंभ उभारण्यात येणार असल्याची माहिती यावेळी आयोजकांनी दिली.

# अमरावती-भातकुली दरम्यान निघाली दिगंबर सकल जैन समाजाची भव्य पदयात्रा

## डिजे, लेझीम पथक, ढोल पथक, दांडिया पथक ठरले आकर्षण



**दि.२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

श्री १०८ सुपार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर, साईनगर येथे संत शिरोमणी आचार्य श्री १०८ विद्यासागरजी महाराज यांचे परम प्रभावक आज्ञानुवर्ती शिष्य परम पूज्य मुनिश्री १०८ पूज्यसागरजी महाराज व ऐलक श्री १०५ धैर्यसागरजी महाराज व अलग श्री सागरजी महाराज यांच्या सानिध्यामध्ये रविवारी सकल दिगंबर जैन समाजातर्फे भव्य पदयात्रा व्रत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या पदयात्रेमध्ये ४७ रथ बनविण्यात आले होते. यावर इंद्र इंद्रायणी विराजमान झाले होते, तसेच ९ डिजे, लेझीम पथक, ढोल पथक, दांडिया पथक, ५०० ध्वजधारक, २०१ महिला कलश, २४ तीर्थंकरचे २४ संदेश देणारे फलक, १०० छत्री तसेच जवळपास चार ते पाच हजार भाविकयामध्ये सहभागी झाले होते. या पदयात्रेकडे पश्चिम विदर्भातील सर्वात मोठी पदयात्रा म्हणून बघितले जात आहे. अमरावती ते भातकुली या मार्गावर जैन भाविकांची आतापर्यंत एकही पदयात्रा निघाली नव्हती. मात्र, पूज्यसागरजी महाराज व ऐलक श्री १०५ धैर्यसागरजी महाराज यांच्या पावन स्पर्शाने, तसेच जय जय गुरुदेव, आदिनाथ भगवान की जय अशा जय घोषणांनी संपूर्ण भातकुली परिसर दणाणून गेला होता. अमरावती त्या भातकुलीपर्यंत जवळपास दोन हजार लोकांची भव्य रॅली काढण्यात आली होती, तर शुक्रवारी जैन मंदिरामध्ये सिद्ध चक्र विधान मंडळाचे पाच दिवसीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या आयोजनाचा समारोप झाला असून, यानिमित्त भातकुली अतिशय क्षेत्र आदिनाथ दिगंबर भगवान यांच्या दर्शनासाठी ही रैली काढण्यात आली होती.

# राज्यातील 'या' जिल्ह्यांत पावसाचे सावट! थंडीही वाढणार; हवामान विभागाचा इशारा

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने बंगालच्या उपसागरातून राज्यात बाष्पयुक्त वारे वाहण्याची शक्यता असून त्यामुळे पुढील काही दिवसात कोकणासह मध्य महाराष्ट्रात हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस होईल असा अंदाज हवामान विभागाने सांगितला आहे. यामुळे आता पुन्हा एकदा शेतकऱ्यांना अवकाळीचा फटका बसू शकतो, गेल्या दोन दिवसांपासून देशात सर्वच ठिकाणी हवामानात बदल झाला आहे. काही ठिकाणी थंडी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. काही राज्यात धुक्याचे प्रमाणही वाढले आहे.

देशातील अनेक राज्यांमध्ये कडाक्याच्या थंडीने नवीन वर्षाची सुरुवात झाली आहे. दिल्लीत नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी लोकांना प्रचंड थंडीचा अनुभव आला आणि कमाल तापमान १७ अंश सेल्सिअस नोंदले, याशिवाय इतर अनेक राज्यांमध्येही थंडीची लाट येण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाने ही माहिती दिली. त्यानुसार ५ ते ११ जानेवारी दरम्यान तापमानात घट होण्याची अपेक्षा आहे. हवामानातील या बदलामुळे काही उत्तर भारतीय राज्यांमध्ये थंडीची लाट निर्माण होण्याची शक्यता आहे.

**या राज्यांमध्ये थंडीची लाट कायम**

IMD चे महासंचालक डॉ मृत्युंजय महापात्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार, ५ ते ११ जानेवारी दरम्यान, आम्ही रात्रीच्या तापमानात घट होण्याची अपेक्षा करत आहोत, यामुळे मध्य भारतातील काही भागात थंडीची लाट येऊ शकते. दिवसाचे तापमान देखील सामान्यपेक्षा कमी राहील, यामुळे विशेषतः मध्य प्रदेश, महाराष्ट्राचा उत्तर भाग, उत्तर प्रदेशचा दक्षिण भाग आणि हरियाणा आणि राजस्थानच्या भागात थंडी वाढेल. आम्ही या भागात ५ ते ११ तारखेपर्यंत थंड लाट वाढू शकते.

IMD नुसार, पश्चिम विषुववृत्तीय हिंदी महासागर आणि लगतच्या आग्नेय अरबी समुद्रावरील पूर्वेकडील लाट आणि कमी दाबाच्या क्षेत्रामुळे, ४ जानेवारीपर्यंत दक्षिण तामिळनाडू, दक्षिण केरळ आणि लक्षद्वीपसह दक्षिण भारतात हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. याशिवाय उत्तरेकडील राज्ये उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये मंगळवार आणि बुधवारी हलका पाऊस पडू शकतो. दक्षिण-पूर्व अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र तयार होत आहे, यामुळे लक्षद्वीप आणि मालदीव या दोन्ही बेटांवर ढग निर्माण होत आहेत. आयएमडीचा अंदाज आहे की, येत्या तीन दिवसांत लक्षद्वीपमध्ये ४०-५० किमी प्रतितास वेगाने जोरदार वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मच्छीमारांनाही समुद्रात न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे.


**राज्यात या ठिकाणी पावसाचा अंदाज**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ५ जानेवारीपर्यंत राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस पडू शकतो. तर दोन दिवसात मध्य महाराष्ट्रात हलक्या पावसाची शक्यता. पुण्यातही पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तसेच मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातील नागपूरसह अन्य जिल्ह्यात पावसाचे वातावरण राहण्याची शक्यता आहे.

# खा.डॉ. अनिल बोंडे यांच्या उपस्थितीत भाजपा कोअर कमिटीची बैठक संपन्न

**दि.२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्यसभा खासदार तथा भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ.अनिल बोंडे यांच्या जनसंपर्क कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली भाजपा अमरावती ग्रामीणच्या महत्वपूर्ण पदाधिकाऱ्यांची अर्थात कोर कमिटीची बैठक रविवारी (ता.३१) पार पडली. आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय व प्रदेश भाजपाकडून आलेल्या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अमरावती ग्रामीण भाजपने कंबर कसली आहे. राज्यसभा खासदार तथा भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. अनिल बोंडे यांच्या नेतृत्वात केंद्रीय व राज्य पातळीवरील कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने आज डॉ.अनिल बोंडे यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात



महत्वपूर्ण पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. बैठकीत आगामी कार्यक्रमाच्या अनुषंगाने मंथन करण्यात आले. यावेळी, प्रदेश सचिव जयंत डेहनकर, सरचिटणीस नितिन गुडधे-पाटील, रेखा मावस्कार, रमेश मावस्कार, महिला जिल्हाध्यक्ष अनितातार्ई तिखिले, पद्माकर सांगोले, मोहन जाजोदिया, अजिंक्य वानखडे, शुभम बायस्कार आदी उपस्थित होते.

# जिजाऊ बँकेवर कोठाळेंची सत्ता कायम १० संचालकांचा दणदणीत विजय




**दि.२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

सहकार क्षेत्रातील प्रतिष्ठित जिजाऊ कमर्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेवर पुन्हाजिजाऊ सहकार पॅनेलचा झेंडा फडकला. बँकेच्या एकूण १५ संचालक पदासाठी झालेल्या या निवडणुकीत जिजाऊ सहकार पॅनेलचे १० संचालक विजयी झाले. तर परिवर्तनाचा नारा देऊन मैदानात उतरलेल्या विरोधकांची दौड मात्र निम्म्यावरच थांबली. या निवडणुकीत परिवर्तन पॅनेलला केवळ ५ जागा जिंकता आल्या.

जिजाऊ कमर्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या १५ संचालक पदासाठी रविवारी (ता.३१) घेण्यात आलेल्या निवडणुकीत ६८ टक्के मतदान झाले. बँकेच्या एकूण ६ हजार



६७६ मतदारांपैकी पैकी ४ हजार ६०१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. सोमवारी (ता.१) शहरातील सुयोग मंगल कार्यालयात या निवडणुकीची मतमोजणी झाली. उत्तरोत्तर प्रगती पथावर अग्रेसर असलेल्या जिजाऊ बँकेची धुरा आपल्याच हाती राहावी, यासाठी बँकेचे दोन्ही आजी-माजी अध्यक्ष पूर्ण ताकदीने निवडणूक मैदानात होते. त्यामुळे यावेळी सहकार कि परिवर्तन याकडे सगळ्यांचेच लक्ष लागून होते. सोमवारी सकाळी मतमोजणीला सुरुवात झाली. मतमोजणीचा पहिला निकाल सहकारचे भटक्या विमुक्त जाती-जमातीचे उमेदवार चाफले यांच्या बाजूने लागला. त्यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी वासुदेव जाधवयांचा पराभव केला. त्यांनतर टप्या-टप्प्याने अन्य प्रवर्गातील विजयी उमेदवारांच्या नावाची घोषणा होत गेली आणि जिजाऊसहकार पॅनेलने सर्वाधिक १० जागा जिंकून जिजाऊ बँकेवरचा झेंडा कायम राखला.

## हे आहेत विजयी उमेदवार

**जिजाऊ सहकार पॅनल** : अविनाश कोठाळे, नितीन डहाके, अनिल बंड, गौरव विधळे, बबन आवारे, श्रीकांत टेकाडे, प्रदीप चौधरी, पल्लवी बारब्दे, सुनील चाफले, स्वप्नील वावरे

**परिवर्तन पॅनल** : प्रशांत गावंडे, राजेंद्र अढाऊ, अरविंद गावंडे, अनिल टाले, वैशाली गुडधे

## मतदारांच्या विश्वासाचा विजय

मतदारांचा आमच्या नेतृत्वावर विश्वास होता, हे या निवडणुकीत सिध्द झाले आहे. पुन्हा एकदा जोषाने सुरूवात करून बँकेला यशोशिावर नेऊ. खऱ्या अर्थाने या निवडणुकीत राजेंद्र जाधव आणि विनोद कोरडे यांनी खूप मेहनत घेतली. त्यांच्यामुळे आणि मतदारांमुळे पुन्हा एकदा बँकेवर वर्चस्व प्रस्तापित झाले असल्याची प्रतिक्रियाअविनाश कोठाळे यांनी विदर्भ प्रजासत्ताक सोबत बोलतांना दिली.

# ट्रक ड्रायव्हर संपाचा मोठा फटका : शहरात पेट्रोल पंपावर मोठ्या रांगा अनेक पंपावरचे पेट्रोल संपले

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

केंद्राच्या प्रस्तावित मोटार वाहन कायद्याविरोधात देशभरातील ट्रक आणि टँकरचालक-मालकांनी अनिश्चित काळासाठी संप पुकारला असून, त्याचा फटका सर्वसामान्यांना बसण्याची शक्यता आहे. या संपात पेट्रोल व डिझेलची वाहने देखील सहभागी झाली. परिणामी इंधन संपण्याच्या शक्यतेने सोमवारी रात्रीपर्यंत शहरातील पेट्रोल पंपावर दुचाकीस्वारांनी एकच गर्दी केली होती.शहरातील बहुतांश पेट्रोल पंपावर नागरिकांनी प्रचंड अशी गर्दी केली होती.ट्रक चालकांच्या



देशव्यापी आंदोलनाचा फटका सर्वसामान्य जनतेला होत आहे. ट्रक चालकांच्या संपामुळे इंधन वाहतूक थांबली आहे. त्यामुळे अनेक पेट्रोल पंपावर इंधनाचा तुटवडा जाणवू लागला आहे. त्यातच काही पेट्रोल पंपावर इंधनच नसल्याचे चित्र निर्माण झाले आहे. पेट्रोल डिझेल मिळत नसल्याने जिथे मिळेल तिथे वाहनांच्या प्रचंड रांगा लागल्या आहेत.

# भरडधान्य खरेदी नोंदणीसाठी मुदतवाढ

**दि.२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

आधारभूत किंमत खरेदी योजनेत भरडधान्य ज्वारी व मका खरेदीसाठी शेतकरी बांधवांकडून ऑनलाइन नोंदणीसाठी अर्ज मागविण्यात आले होते. परंतु, पुरेशी नोंदणी न झाल्याने त्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. पात्र व इच्छुक शेतकऱ्यांनी १५ जानेवारीपर्यंत ऑनलाइन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांनी केले आहे.

आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत राज्य शासनामार्फत भरडधान्य ज्वारी व मका खरेदीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी करण्यासाठी जिल्हा मार्केटिंग अधिकारी कार्यालयामार्फत अचलपूर, मोशी, वरूड, धामणगाव रेल्वे या चार तालुक्यांत खरेदी केंद्रे उघडण्यात आली आहेत. नोंदणी करताना या हंगामापासून ज्या शेतकऱ्यांच्या सातबारामध्ये पिकपेऱ्याची नोंद असावी, आधार कार्ड, ॲक्टिव बँक खातेची अचूक माहिती या सर्व तपशील द्यावा, शेतकऱ्याने लाइव्ह फोटो अपलोड करण्यासाठी स्वतः खरेदी केंद्रावर उपस्थित राहण्याबाबत जिल्हा मार्केटिंग अधिकारी कार्यालयामार्फत आवाहन करण्यात आले आहे.

# राज्यभरातील एसटीच्या फेऱ्या डिझेल अभावी बंद होण्याची शक्यता

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

देशभर ट्रक आणि बसचालकांनी आंदोलन पुकारले असून इंधनाची वाहतूक आणि पुरवठा करणाऱ्या वाहनांवरील चालकही संपावर गेले आहेत. परिणामी, पेट्रोल, डिझेलचा तुटवडा निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे वाहनांमध्ये पेट्रोल, डिझेल भरण्यासाठी मंगळवारी सकाळपासून पेट्रोल पंपावर वाहनचालकांनी गर्दी केली आहे. ट्रक-बस चालकांच्या संपाचा फटका एसटीलाही बसण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. डिझेल अभावी एसटी बस सेवा बंद होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

'हिट ॲण्ड रन' प्रकरणातील दोषींना १० वर्षांचा तुरुंगवास आणि सात लाख रुपये दंड अशा शिक्षेची तरतूद असलेल्या नवीन कायद्याविरोधात देशभरातील ट्रक आणि बसचालकांनी सोमवारपासून निदर्शने आंदोलन सुरू केले आहे. नववर्षाची सुरुवातच



आंदोलनाने झाल्याने त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. नवी मुंबई, मुंबई, ठाणे, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भासह देशातील महत्त्वाच्या शहरात ट्रक आणि बस चालकांचे आंदोलन सुरू आहे. राज्यातही या आंदोलनाचा प्रभाव जाणवू लागला असून मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात इंधन पुरवठा ठप्प झाला आहे. विदर्भात आंदोलन चिघळले असून विदर्भातील काही आगारांमधील एसटीच्या फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच देशभरात शांततेत सुरू असलेले आंदोलन आता चिघळू लागले आहे.महाराष्ट्राची जीवनवाहिनी म्हणून ओळख असलेली लालपरी सर्वसामान्य प्रवाशांसाठी खूप जवळची आहे. राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या बहुसंख्य बसगाड्या डिझेलवर धावतात. दररोज एसटीच्या सरासरी १४ हजार बसेगाड्या धावतात. या बससाठी दररोज सरासरी ११ लाख लिटर डिझेल लागते. एसटीच्या बसना लागणाऱ्या डिझेलची पूर्तता न झाल्यास एसटीची सेवा खोळंबण्याची शक्यता आहे. त्यामुळे एसटीमधून प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांना फटका बसण्याची शक्यता आहे. दरम्यान, एसटीच्या २५० आगारांत बसगाड्यांमध्ये डिझेल भरण्याची सुविधा आहे. इंडियन ऑइल कार्पोरेशन (आयओसी) व भारत पेट्रोलियम (बीपीसीएल) या दोन कंपन्यांकडून एसटी महामंडळ डिझेल खरेदी करते. सर्व आगारांत मंगळवारी पुरेल इतका डिझेल साठा उपलब्ध आहे. संप आणखी काही दिवस सुरू राहिल्यास डिझेलची डिझेलचा तुटवडा निर्माण होईल आणि एसटी बसच्या फेऱ्या रद्द कराव्या लागतील, अशी भिती एसटीतील वरिष्ठ अधिकाऱ्याने व्यक्त केली.

# अमरावती विभाग दुष्काळग्रस्त; अंतिम पैसेवारी पन्नासपेक्षा कमी

**दि.२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

विभागातील पाचही जिल्ह्यांतील अंतिम पैसेवारी ही पन्नास पैशांपेक्षा कमी जाहीर करण्यात आल्याने अमरावती विभागातील दुष्काळी स्थितीवर शिक्कामोर्तब झाले आहे. अमरावती आणि बुलढाणा जिल्ह्याची पैसेवारी ४७ पैसे असून अकोला, यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्याची पैसेवारी ४८ पैसे इतकी जाहीर करण्यात आली आहे.

अमरावती जिल्ह्यातील चौदाही तालुक्यातील १९९० गावातील अंतिम पैसेवारी ४७ पैसे काढण्यात आली आहे. यावर्षी खरीप हंगामात




सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला असून पावसाची अनियमितता, नंतर परतीचा पाऊस याचा परिणाम खरिपातील मुख्य पिकावर झाला. सोयाबीनसह कापूस व तुरीची उत्पादन सारसरी कमालीची घसरली.

या पार्श्वभूमीवर महसूल विभागाने काढलेल्या नजर अंदाज व सुधारित पैसेवारी ५२ पैसे आली होती. मात्र प्रत्यक्षात उत्पादन सरासरी शेतकऱ्यांमध्ये रोष निर्माण झाला होता. अंतिम पैसेवारीकडे सर्वांचे लक्ष लागून होते. ती ४७ पैसे आल्याने जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीवर शिक्का मोर्तब झाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने अधिकृतरित्या १९९० गावांची स्थिती जाहीर करत जिल्ह्याची पैसेवारी ४७ पैसे घोषित केली आहे.

अकोला जिल्ह्याची सुधारित पैसेवारी ५३ पैसे जाहीर करण्यात आली होती, पण अंतिम पैसेवारीत सुधारणा होऊन ती ४८ पैसे जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. वाशिम जिल्ह्याची अंतिम पैसेवारी ४८ पैसे इतकी असल्याचे प्रशासनाने जाहीर केली आहे. जिल्ह्यात एकूण ७९३ गावे असून या सर्वच गावांची खरीप हंगामाची अंतिम पैसेवारी पन्नास पैशांपेक्षा कमी आहे. बुलढाणा जिल्ह्याची अंतिम पैसे वारी ४७ इतकी आली आहे. एकूण १४२० गावांची अंतिम पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आल्याने दुष्काळावर शिक्कामोर्तब झाले आहे.

## या मिळणार सवलती

बाधित गावांना दुष्काळाच्या आठ सवलती लागू होणार आहेत. यामध्ये जमीन महसुलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्ज वसुलीस स्थगिती, कृषी पंपांच्या वीजबिलात ३३.५ टक्के सूट, शालेय व महाविद्यालयीन परीक्षा शुल्क माफी, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी टँकरने पुरवठा, टंचाई जाहीर झालेल्या गावात कृषी पंपाची वीज जोडणी खंडित न करणे, या बाबींचा समावेश आहे.

# शरद पवार फुंकणार लोकसभेचे रणशिंग; शिर्डीत राष्ट्रवादीचे २ दिवसीय शिबीर

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक शिर्डी**

आगामी लोकसभा निवडणूकांच्या दृष्टीने सर्वच पक्षांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. निवडणूक जशजशा जवळ येतील तसतसे राजकीय वातावरण तापू लागल्याचे चित्र दिसत आहे. एकीकडे अजित पवार हे राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाला आव्हान देत असतानाच आता शरद पवार



गटानेही लोकसभेचे रणशिंग फुंकायला सुरूवात केली आहे. उद्यापासून शिर्डीमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाचे दोन दिवसीय शिबीर आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये लोकसभा निवडणूकांसंदर्भात मोठे निर्णय होण्याची शक्यता आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, उद्यापासून (३, जानेवारी) शिर्डीत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे दोन दिवसीय शिबिर आयोजित करण्यात आले आहे. पालखी निवारा परिसरात होणाऱ्या या शिबिराची जय्यत तयारी करण्यात येत आहे. या शिबिरासाठी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार सुप्रियाताई सुळे , अमोल कोल्हे, रोहित पवार यांच्यासह शरद पवार गटाचे नेते आणि पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

## लोकसभेचे रणशिंग फुंकणार

'ज्योत निष्ठेची, लोकशाहीच्या संरक्षणाची' हे ब्रीद वाक्य घेऊन शरद पवार गटाचे कार्यकर्ते एकवटणार आहेत. मागील वर्षीही याच ठिकाणी राष्ट्रवादीचे शिबिर झाले होते. यावेळी मात्र राष्ट्रवादीत दोन गट पडल्यानंतर या शिबिराकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले आहे. तसेच या शिबिरातून शरद पवार गट फुंकणार आगामी निवडणुकांचे रणशिंग फुंकण्याचीही शक्यता आहे.

# पंपांवर रांगा, भाजीपाला महागला; घरगुती गॅसही मिळेना ट्रक चालकांच्या संपामुळे जनजीवन विस्कळित, काय होतोय परिणाम?

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

देशभरात ट्रक चालकांनी पुकारलेल्या संपाची झळ सर्व सामान्यांना बसताना दिसत आहे. ट्रक चालकांच्या संपामुळे भाजीपाल्याचा, इंधनाचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे पेट्रोल पंपाबाहेर गाड्यांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र आहे. या संपामुळे रुग्णवाहिका, स्कूल बसेस, दैनंदिन बससेवाही विस्कळीत झाली आहे.

हिट अँड रन कायद्याच्या विरोधात देशभरात पेट्रोल डिझेल टँकर चालकांनी तीन दिवसाचा संप पुकारला आहे. या संपाचा सर्वाधिक फटका इंधन विक्रीवर होत आहे. त्यामुळे पेट्रोल पंपावर वाहनधारकांची इंधन भरण्यासाठी मोठी गर्दी होत आहे. विविध शहरातील पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.

### भाजीपाला महागला...

ट्रक चालकांच्या संपाचा काहीसा फटका एपीएमसी भाजीपाला मार्केट वर झालेला पहायला मिळतोय. एपीएमसी बाजारात परराज्यातील माल आला नसून राज्यातील काही भागातून भाजीपाल्याची आवक काही प्रमाणात झाली आहे. भाजीपाल्याची आवक पन्नास



टक्क्यांनी घसरली असून ग्राहक देखील घटल्याने भाजीपाल्याला उठाव नाही.

### बससेवेवर परिणाम...

पेट्रोल आणि डिझेल वाहतूक दारांच्या संपाचा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर परिणाम होताना दिसत आहे. रायगड जिल्ह्यातील एस टी च्या ८ आगारांमध्ये आजचा दिवस पुरेल इतकाच डिझेल साठा शिल्लक आहे. रायगडमध्ये ८ आगारांना दिवभरात ३२ हजार लिटर डिझेलची गरज असते. सध्या तरी संपाचा एस टी वर परिणाम नसला तरी उद्या पर्यंत संप मिटला नाही तर एस टी सेवा ठप्प होण्याची भीती निर्माण झाली आहे.

### घरगुती गॅसचा तुटवडा..

दरम्यान, या ट्रक चालकांच्या या थेट गृहिणींच्या स्वयंपाकासाही फटका बसल्याचे चित्र बुलढाणा जिल्ह्यात दिसत आहे. बुलढाण्यात एलपीजी गॅसचा पुरवठा धणज आणि मनमाड येथून केला जातो. गॅस सिलेंडर संपल्यामुळे गॅस एजन्सी चालकांनी दोन दिवसांपूर्वीच आपले ट्रक गॅस रिफील सेंटरकडे पाठवले होते. मात्र आजचा तिसरा दिवस उजाडल्याने हे ट्रक गॅस सिलेंडर भरून परत न आल्याने आता शहरी आणि ग्रामीण भागात एलपीजी गॅसचा तुटवडा निर्माण झाला आहे.